# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. नअ / २१३२५ / चौकशी दि. 19/1/2016

## परिपत्रक

**विषय - परिवहन रचनाकार (दुय्यम अभियंता / सहाय्यक अभियंता ) व परिवहन अभियंता (दुय्यम अभियंता / सहाय्यक अभियंता ) या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पदांच्या विहित अर्हता.**

**संदर्भ - अति.आयुक्त / प.उप./डी / ८५५७ दि. ३०.११.२०१५.**

नगर अभियंता खात्यातील उप प्रमुख अभियंता (वाहतूक) यांच्या आस्थापनेवर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या परिवहन रचनाकार (दु. अभि. /सहा. अभि.) व परिवहन अभियंता (दु. अभि. /सहा. अभि.) या पदांच्या अर्हतांना मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प. उपनगरे ) यांनी दि. ३०.११.२०१५ च्या अति.आ/प.उ/ डी / ८५५७ अन्वये मंजूरी दिली आहे.

सर्व खाते प्रमुख, विभाग अधिकारी यांना कळविण्यात येते की संबंधित कर्मचारी वर्गाकडून या अर्हतांची नोंद करुन घेण्यासाठी सोबतचे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रक आपल्या विभागीय कर्मचा-यांत प्रसारित करावे व ते ठळकपणे सूचना फलकावर लावून त्यास जास्तीत जास्त प्रसिध्दी दयावी.

(सही) १८/१/२०१६

**नगर अभियंता**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उपनगरे) यांनी दि. ३०.११.२०१५ च्या क्र. अति. आ/प.उ/डी/८५५७ अन्वये मंजूरी दिलेल्या परिवहन रचनाकार (दु.अभि.) पदाच्या अर्हता.

(अ) **निवडीने / सरळसेवेने**

१) **वयाची अट -**
महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास उमेदवाराचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागास वर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वय ३८ वर्षे)
महानगरपालिकेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

२) **शैक्षणिक अर्हता -**
i) अ)ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य वा कन्स्ट्रक्शन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

ब) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (स्थापत्य) अभियांत्रिकीमधील परिक्षा देऊन ज्या संस्थेचे सभासदत्व इंन्स्टिटयूशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ii) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी धारण करुन मान्यताप्राप्त विद्यापीठाची /नियोजन शाळेमधील परिवहन नियोजनामधील पदव्युत्तर पदवीधारक असावा. उदा. Post graduation in 'Transportation Plannning' from School of Planning, CEPT (Center for Environmental Planning & Technology University, Ahmedabad etc. Which issue P.G Degree in 'Transportation Planning' as specialization.

३) **मराठी भाषा** - उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४) **संगणक ज्ञानाबाबत** - उमेदवार डीओईएससी सोसायटीचे सी सी सी किंवा 'ओ' स्तर किंवा' ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने /तिने शासनाने विहीत केलेली एमएससीआयटी ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

— ० —

## बृहन्मुंबई महानगरपालिका

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उपनगरे) यांनी दि. ३०.११.२०१५ च्या क्र. अति. आ/प.उ/डी/८५५७ अन्वये मंजूरी दिलेल्या परिवहन रचनाकार (सहा. अभि.) पदाच्या अर्हता.

**(अ) पदोन्नतीने -**

१) परिवहन रचनाकार (दु.अभि.) पदावर किमान ५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचा-यांमधून सेवा ज्येष्ठतेने

२) मराठी भाषा - उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय उच्च स्तर किंवा निम्नस्तर घेऊन उत्तीर्ण असावा. तथापि त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महापालिका प्रशासनातर्फे घेण्यात येणारी मराठी भाषेची परिक्षा प्रचलित धोरणानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३)संगणक ज्ञानाबाबत - अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास कर्मचारी डीओईएसीसी सोसायटीचे सी सी सी किंवा 'ओ' स्तर किंवा' ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

**ब) निवडीने / सरळसेवेने** - उपरोक्त (अ) प्रमाणे पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास
१) वयाची अट - महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर नसल्यास वय ४० पेक्षा जास्त नसावे (मागास वर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वय ४५ वर्षे
महानगरपालिकेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**२) शैक्षणिक अर्हता -**
i) अ)ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य वा कन्स्ट्रक्शन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

ब) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (स्थापत्य) अभियांत्रिकीमधील परिक्षा देऊन ज्या संस्थेचे सभासदत्व इन्स्टिटयूशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ii) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी धारण करुन मान्यताप्राप्त विद्यापीठाची /नियोजन शाळेमधील परिवहन नियोजनामधील पदव्युत्तर पदवीधारक असावा. उदा. Post graduation in 'Transportation Plannning' from School of Planning, CEPT (Center for Environmental Planning & Technology University, Ahmedabad etc. Which issue P.G Degree in 'Transportation Planning' as specialization.

३) **अनुभव** - उमेदवाराला वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर परिवहन रचनाकार म्हणून शहरी भागातील वाहतूक नियोजन व राष्ट्रीय परिवहन धोरणाचे सखोल ज्ञान असणे तसेच त्या बाबतच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे वाहतूक देखभाल व परिवहन सर्वेक्षण करणे माहिती संकलित करुन तिचे पृथ्थकरण करणे लोकसंख्या व रोजगार यांचे अंदाज बांधणे प्रवासी मागणीचा नमुना बनविणे वाहतूक अंदाज बांधणे वाहतूक परिणामांचा विचार करुन शुल्क आकारणी करणे व सुसहय वाहतूकीच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा अभ्यास करण्यासाठी सल्लागार नेमण्यासाठी विनंती प्रस्ताव तयार करणे इत्यादी कामांचा कमीतकमी ५ वर्षांचा अनुभव असावा.

४) **मराठी भाषा** - उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५) **संगणक ज्ञानाबाबत** - उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे सी सी सी किंवा 'ओ' स्तर किंवा' ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने /तिने शासनाने विहीत केलेली एमएससीआयटी ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

— ० —

# बृहन्मुंबई महानगरपालिका

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उपनगरे) यांनी दि. ३०.११.२०१५ च्या क्र. अति. आ/प.उ/डी/८५५७ अन्वये मंजूरी दिलेल्या परिवहन अभियंता (दु.अभि.) पदाच्या अर्हता.

**(अ) निवडीने / सरळसेवेने**

**१) वयाची अट -**
महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास उमेदवाराचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागास वर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वय ३८ वर्षे)
महानगरपालिकेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**२) शैक्षणिक अर्हता -**
i) अ)ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य वा कन्स्ट्रक्शन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

ब) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (स्थापत्य) अभियांत्रिकीमधील परिक्षा देऊन ज्या संस्थेचे सभासदत्व इंन्स्टिटयूशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ii) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी धारण करुन मान्यताप्राप्त विद्यापीठाची परिवहन अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवीधारक असणे आवश्यक आहे . उदा. Post graduation in 'Transportation Engineering from IITs, NITs. and reputed Universities which issues the P.G. Degree in Transportation Engineering / Transportation system Engineering as specialization.

**३) मराठी भाषा** - उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४) **संगणक ज्ञानाबाबत** - उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे सी सी सी किंवा 'ओ' स्तर किंवा' ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने /तिने शासनाने विहीत केलेली एमएससीआयटी ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

— ० —

# बृहन्मुंबई महानगरपालिका

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उपनगरे) यांनी दि. ३०.११.२०१५ च्या क्र. अति. आ/प.उ/डी/८५५७ अन्वये मंजूरी दिलेल्या परिवहन अभियंता (सहा. अभि.) पदाच्या अर्हता.

**(अ) पदोन्नतीने -**

१) परिवहन अभियंता (दु.अभि.) पदावर किमान ५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचा-यांमधून सेवा ज्येष्ठतेने

२) **मराठी भाषा** - उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय उच्च स्तर किंवा निम्नस्तर घेऊन उत्तीर्ण असावा. तथापि त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महापालिका प्रशासनातर्फे घेण्यात येणारी मराठी भाषेची परिक्षा प्रचलित धोरणानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) **संगणक ज्ञानाबाबत** - अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास कर्मचारी डीओईएसीसी सोसायटीचे सीसीसी किंवा 'ओ' स्तर किंवा' ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

**ब) निवडीने / सरळसेवेने** - उपरोक्त (अ) प्रमाणे पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास
१) वयाची अट - महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर नसल्यास वय ४० पेक्षा जास्त नसावे (मागास वर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वय ४५ वर्षे )
महानगरपालिकेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**२) शैक्षणिक अर्हता -**
i) अ)ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य वा कन्स्ट्रक्शन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तिच्याशी समकक्ष अर्हता संपादित केली आहे किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

ब) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (स्थापत्य) अभियांत्रिकीमधील परिक्षा देऊन ज्या संस्थेचे सभासदत्व इन्स्टिटयूशन ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ii) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी धारण करून मान्यताप्राप्त विद्यापीठाची परिवहन अभियांत्रिकीमधील पदव्युत्तर पदवीधारक असावा. उदा. Post graduation in 'Transportation Engineering from IITs, NITs and reputed Universities which issues the P.G.Degree in Transportation Engineering/Transportation System Engineering as specialization.

३) **अनुभव** - उमेदवाराने वरील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर परिवहन अभियंता म्हणून वाहतूक व परिवहन अभियांत्रिकीतील विविध विभागात काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. रस्ता सुरक्षा विषयक व वाहतुकीसंबंधीचे ज्ञान असणे तसेच वाहतूक देखभाल व परिवहनाचे सर्वेक्षण करुन माहिती संकलित करणे, प्राप्त माहितीचे पृथ्थकरण करणे, वाहतूक व्यवस्थापनाची उपाय योजना करणे, वाहतूक नियंत्रण संकल्पचित्रे तयार करुन त्यांचे परिरक्षण करणे, रस्ते/ महामार्ग यांचे संकल्पचित्रे तयार करणे व परिवहन प्रकल्पांच्या कामाच्या निविदा बनविणे इत्यादि कामांचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असावा.

४) **मराठी भाषा** - उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नप्रत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५) **संगणक ज्ञानाबाबत** - उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे सीसीसी किंवा 'ओ' स्तर किंवा' ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने /तिने शासनाने विहीत केलेली एमएससीआयटी ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

—o—o—